स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रचार...

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र. ४/का-५.
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ९ एप्रिल, २०१०.

## आ दे श

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रचार करण्यासाठी राजकीय नेते, कार्यकर्ते व इतर व्यक्ती त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीबाहेरुन येऊन प्रचार करतात. अशा व्यक्ती जर जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर जर त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीत राहिले तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्‌भवू शकतो. निवडणुका शक्य तेवढया मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रचार करण्यासाठी जे राजकीय नेते, कार्यकर्ते व इतर व्यक्ती त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीबाहेरुन येतात त्यांनी त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीतील जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीमध्ये वास्तव्य करु नये.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

( रा. नी. पांडे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
पोलिस महासंचालक
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व पोलिस आयुक्त / पोलिस अधिक्षक
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व नगर परिषदा / नगर पंचायतीचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

D:\Removable Disk ... DATA CORPORATION\orders.doc